आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि.३०/०७/२०२१ नुसार योजना अंमल बजावणीच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत. यानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत दि.१८ सप्टेंबर, २०१९, दि.०९, ऑगस्ट, २०२०, दि.१८ जानेवारी, २०२२, दि.२१ जुलै, २०२२ रोज़ी महाराष्ट्रातील सर्वाधिक खपाच्या अ वर्ग वृत्तपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरातीद्वारे व्यापक प्रसिद्धी देऊन आदिवासी भागातील आदिवासी शेतकरी उत्पादक कंपन्या / सहकार संस्था / समुह / ग्रामसभा / फेडरेशन / वनधन समुह (FPC / Co.Op. / FPG / Gramsabha / Federation / VDVK) इ. यांना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यांत आले होते. त्यानुसार प्राप्त प्रस्तावांची छाननी व मुल्यांकन करण्यांत आलेले होते. योजने अंतर्गत प्राप्त प्रस्तावांचे मुल्यांकन करणेसाठी खालील प्रमाणे संनियंत्रण समिती गठीत करण्यांत आलेली आहे.

१.	व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक	अध्यक्ष
२.	आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक	सह अध्यक्ष
३.	आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे	सदस्य
४.	अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक	सदस्य
५.	संचालक, आत्मा, कृषी आयुक्तालय, पुणे	सदस्य
६.	महाव्यवस्थापक, वित्त, शबरी महामंडळ, नाशिक	सदस्य
७.	प्रकल्प व्यवस्थापक, शबरी महामंडळ, नाशिक	सदस्य सचिव

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडून योजनेच्या प्रारूप करारनाम्यास राज्य स्तरीय सुकाणू समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

योजनेंतर्गत प्रस्तावांचे करारनाम्यास मंजुरी देणेसाठी खालील प्रमाणे राज्य स्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात आलेली आहे.

१.	सचिव, आदिवासी विकास	अध्यक्ष
२.	आयुक्त, कृषि	सदस्य
३.	आयुक्त, आदिवासी विकास	सदस्य
४.	उप सचिव, केंद्रीय योजना, आ. वि. वि.	सदस्य
५.	ट्रायफेड प्रतिनिधी	सदस्य
६.	विषय तज्ञ	आमंत्रित सदस्य
७.	व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक	सदस्य सचिव

दिनांक २१ जुलै २०२२ रोजी दिलेल्या जाहिरातीनुसार या कार्यालयास ११० च्या वर प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावांचे छाननी करून सादरीकरण आयोजित करण्याची कार्यवाही या कार्यालयाकडून सुरु आहे.

तसेच योजनेंतर्गत उर्वरित निधीसाठी या कार्यालयाकडून दिनांक ०९.०९.२०२२ रोजी दै. सकाळ या वृत्तपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करून आदिवासी भागातील आदिवासी शेतकरी उत्पादक कंपन्या/संस्था.सह /समूह/ ग्रामसभा/ फेडरेशन/ वनधन समूह (FPC/ FPG/Coop./Gram Sabha/Federation/VDVK) ई यांना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यांत आलेले आहे.

ठराव क्र.११.२ :- विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत Organizing FPOs of 15000 farmers for processing distribution, branding and retailing **योजनेअंतर्गत निवडण्यांत आलेल्या उपप्रकल्पांना व पुढील नियोजनास मंजुरी देण्यांत आली.**

सुचक :- मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक

अनुमोदक :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

विषय क्र ११.३ : केंद्र शासनाच्या जनजाती कार्य मंत्रालय (Ministry of Tribal Affairs) यांचे मार्फत भारतीय संविधानाच्या परिच्छेद २७५(१) (Provision under Article 275(1)) निधी अंतर्गत Bharat Rural Livelihoods foundation Improving Livelihood conditions by augmenting land and water resources. Sustainable agri practices, enhancing livestock productivity, capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government schemes योजना राबविणेबाबत...

राज्य शासनाने सन 2019-2020 या आर्थिक वर्षाकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्देद 275(1) अंतर्गत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथे प्रकल्प मुल्यमापन समितीची Project Appraisal Committee (PAC) च्या दिनांक 12.02.2019 रोजी आयोजित बैठकीत एकुण रक्कम रुपये 15184.29 लाख निधीच्या प्रस्तावांना मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

या बैठकीच्या इतिवृत्तानुसार 4.1.2 मधील अ.क्र.5 नुसार Bharat Rural Livelihoods foundation Improving Livelihood conditions by augmenting land and water resources. Sustainable agri practices, enhancing livestock productivity, capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government schemes या योजने अंतर्गत रक्कम रुपये 200.00 लाख इतका निधी मंजुर करण्यात आला आहे. यानुसार शबरी महामंडळाने दिनांक 13.04.2020 च्या पत्रान्वये मा.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडे योजना राबविण्यासाठी निधीची मागणी केली आहे.

यामध्ये नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपुर व यवतमाळ या मागासवर्गीय जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेत जलसंधारण, कृषी, पशुधन विकास व गौणवनोपज या योजना मुख्यत: राबविण्याचा हेतू आहे. IFR/CFR, पेसा, संयुक्त वन व्यवस्थापन, वनहक्क व ग्रामसभा सक्षमीकरण हे सर्व या तालुक्यात घेण्यात येवून कृषी संबंधी काम करतांना क्लस्टर निहाय प्राधान्य दिले जाईल व गौणवनोपज इतर शेतमालावर प्रक्रिया करतांना व पशुधन विकास तसेच जलसंधारणाचे काम करातांना स्थानिक परिस्थिती लक्षात घेवून काम केले जाईल.

योजनेचे कार्यक्षेत्र

Name of CSO	District	Block	No. of GPs	No. of Village	Targeted HHs
BAIF	Nandurbar	Dhadgaon	10	26	3000
	Gadhchiroli	Etapalli	06	25	1500
Lupin Foundation	Nandurbar	Dhadgaon	17	27	1500
		Akkalkuwa	08	14	1500
Gramin Yuwa Pragatik Mandal (GYPM)	Gondia	Deori	06	19	1500
Gramin Samsya Mukti Trust	Yavatmal	Jari Jamni	14	25	2000
Visak Sahyog Pratisthan	Amrawati	Dharni	08	12	2000
Khoj	Amrawati	Chikhaldhara	07	21	2000
			76	**169**	**15000**

सदर योजना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक हे राबविणार असल्याने या योजनेसाठी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडून 54.66 लाख रुपये प्राप्त झाले आहे. उर्वरित निधी रु. 145.34 लक्ष आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून अप्राप्त आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक यांनी Bharat Rural Livelihoods Foundation, New Delhi यांना एकूण रक्कम रु. 100.00 लक्ष निधी वर्ग केले आहे. सदर निधी वर्ग करतेवेळी 'Organizing FPOs of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing' या योजनेच्या प्राप्त निधीपैकी रक्कम रु . 45.34 लक्ष निधी हा तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेला आहे.

योजनेचा उर्वरित निधी प्राप्त होतो तो पर्यंत या कार्यालयाकडून Bharat Rural Livelihoods Foundation, New Delhi यांना 'Organizing FPOs of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing' या योजनेचा रक्कम रु .45.34 लक्ष निधी परत करून पुढील निधीची मागणी करण्यास सांगण्यात आलेले आहेत. तसेच योजनेचा उर्वरित निधी रु. 145.34 लक्ष आयुक्त, आदिवासी विकास यांचे कडून प्राप्त करून घेण्याबाबत पाठपुरावा सुरु असणेबाबत व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले.

ठराव क्र.११.३ :- केंद्र शासनाच्या जनजाती कार्य मंत्रालय (Ministry of Tribal Affairs) **यांचे मार्फत भारतीय संविधानाच्या परिच्छेद २७५(१)** (Provision under Article 275(1)) **निधी अंतर्गत** Bharat Rural Livelihoods foundation Improving Livelihood conditions by augmenting land and water resources. Sustainable agri practices, enhancing livestock productivity, capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government schemes **योजनेअंतर्गत घेण्यांत आलेल्या उपक्रमांना तसेच पुढील नियोजनास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. योजना राबवित असतांना शासनाच्या इतर विभागांशी अभिसरण (Convergence) करणे अत्यावश्यक आहे. त्याबाबत नियोजन अंमलबजावणी संस्थेकडून करुन घेण्यांत यावे. योजने अंतर्गत असलेला अप्राप्त निधी प्राप्त करुन घेण्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास कार्यालयाशी तात्काळ संपर्क करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या.**

विषय क्र १२ : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे मार्फत धुळे विभागातील शहादा येथे वाहन चालक प्रशिक्षण केंद्र सुरु करून आदिवासी विद्यार्थ्यांना वाहन चलनाचे प्रशिक्षण देणेबाबत...

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील चालक पदातील अनुसूचित जमातीचा अनुशेष भरून निघावा व त्यांच्या रोजगाराचा प्रश्न सुटावा याकरिता महाराष्ट्रातील विविध भागातील आदिवासी युवक-युवतींना चालक पदाचे प्रशिक्षण देऊन राज्य परिवहन सेवेमध्ये सामावून घेणेकरिता आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे सहकार्याने ५ जुलै १९९० पासून पांढरकवडा जि.यवतमाळ व २६ जानेवारी १९९६ पासून गडचिरोली या ठिकाणी आदिवासी चालक प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

या प्रशिक्षण केंद्रांतर्गत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्याचा असून प्रशिक्षणाची वर्षातून २ सत्रे घेण्यात येतात. प्रत्येक सत्रामध्ये ५० प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. या केंद्रांच्या प्रशिक्षणावरील आवर्ती व अनावर्ती खर्चापैकी २/३ खर्च राज्य शासनाकडून व १/३ खर्च म. रा. मा. प. महामंडळाकडून केला जातो.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांचेकडील पत्र. क्र. TRTI/ESDP/२०१९-२० दिनांक. ५ सप्टेंबर २०१९ नुसार सदर प्रशिक्षण केंद्रामार्फत आदिवासी युवक-युवतींना प्रशिक्षण देणेसाठी आवर्ती व अनावर्ती खर्च करणेसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांना रक्कम रु. ७४.४० लक्ष निधी प्राप्त झालेला आहे. सदर निधीच्या माध्यमातून पांढरकवडा व गडचिरोली येथील प्रशिक्षण केंद्रांमार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे. विभाग नियंत्रक, रा. प. धुळे यांनी पत्र जा. क्र. रा.प./विनिधु/आस्था/३८८८ दिनांक २५.०६.२०१९ अन्वये म. रा. मा. प. महामंडळातील चालक पदातील अनुसूचित जमातीचा अनुशेष ९०० भरून निघावा व त्यांचा रोजगाराचा प्रश्न सुटावा याकरिता पांढरकवडा व गडचिरोली येथील आदिवासी विकास विभागाच्या मदतीने सुरु असलेल्या प्रशिक्षण केंद्रांच्या धर्तीवर नंदुरबार, धुळे, जळगाव व नाशिक येथील आदिवासी बहुल क्षेत्रातील आदिवासी तरुणांकरिता शहादा-धुळे विभाग येथे ५० उमेदवारांकरिता ६ महिन्याच्या सत्राकरिता (वार्षिक १०० उमेदवारांसाठी) आदिवासी चालक पदाचे प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित करण्यासाठी रक्कम. रु. ४१५.८४ लक्ष रकमेचा प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विकास यांना सदर केलेला होता.

आयुक्त, आदिवासी विकास यांनी पत्र. क्र.विसप-२०१९/प्र.क्र.१५/का.३(३)/४१६९ दिनांक ८ जुलै २०१९ नुसार शहादा – धुळे विभाग येथे म. रा. मा. प. महामंडळाची ४.६७ हेक्टर इतकी जमीन उपलब्ध असून त्याठिकाणी आदिवासी चालक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक ते बांधकाम म. रा. मा. प. महामंडळामार्फत करण्यात आलेले आहे. त्याकरिता विभाग नियंत्रक, रा.प. धुळे यांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देऊन निधी रक्कम रु. ४१५.८४ लक्ष उपलब्ध करून देण्यात यावा अशी शिफारस व विनंती प्रधान सचिव, आदिवासी विकास यांना केलेली होती.

तत्कालीन प्रधान सचिव, आदिवासी विकास, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडल मर्या., नाशिक व तत्कालीन आयुक्त, आदिवासी विकास यांच्यात झालेल्या चर्चेनुसार सदर योजना शबरी महामंडळाकडे नियंत्रणाकरिता देऊन तसा प्रस्ताव पाठवून निधीची मागणी करण्याचे ठरले होते.

व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., धुळे यांनी पत्र जा.क्र. शआविविम/प्रकल्प/स.स./४०६/२०१९ नुसार प्रधान सचिव, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI), पुणे यांना सदर योजना राबविण्याकरिता रक्कम रु. ५२३.०० लक्ष निधी मिळावा असे कळविले होते.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी पत्र जा.क्र. TRTI/ESDP/2019-20 दिनांक ११.११.२०१९ नुसार Maharashtra State Road Transport Corporation (MSRTC) – Shahada, Dhule Dist-Nashik या नावाने या कार्यालयास रक्कम रु. ५३४.०० लक्ष निधी वर्ग केलेला आहे.

विभाग नियंत्रक, म. रा. मा. प. महामंडळ, धुळे यांनी पत्र जा.क्र./विनिधु/आस्था/श.प्र. केंद्र /२२९० दिनांक १९.०५.२०२१ नुसार शहादा-धुळे विभाग येथे ५० उमेदवारांकरिता ६ महिन्यांच्या सत्राकरिता (वार्षिक- १०० उमेदवारांसाठी) आदिवासी चालक प्रशिक्षण देण्याकरिता व यशस्वी प्रशिक्षणाती रा.प. महामंडळाच्या सेवेमध्ये चालक पदी नियुक्ती देण्यासाठी आदिवासी चालक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी रक्कम रु. ५४८.७५ लक्ष किमतीचा प्रस्ताव शबरी महामंडळास सादर केलेला आहे.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म. रा. मा. प. महामंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६.०३.२०२२ रोजी झालेल्या ऑनलाईन बैठकीत व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांनी सदर योजनेस मंजूर निधी रक्कम रु. ५३४.०० लक्ष असल्याने विभाग नियंत्रक, म. रा. मा. प. महामंडळ धुळे यांनी मंजूर निधीच्या मर्यादेत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार विभाग नियंत्रक, म. रा. मा. प. महामंडळ, धुळे यांनी पत्र जा.क्र./राप/विनिधु/आस्था/श.प्र.केंद्र/१८९५ दिनांक १४.०६.२०२२ नुसार रक्कम रु. ५३४.०० लक्ष किमतीचा सुधारित प्रस्ताव प्रस्ताव शबरी महामंडळास सादर केलेला आहे.

या करिता " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक पदातील अनुसूचित जमातीचा अनुशेष १०० भरून निघावा व त्यांचा रोजगाराचा प्रश्न सुटावा याकरिता नंदुरबार, धुळे, जळगाव व नाशिक येथील आदिवासी बहुल क्षेत्रातील आदिवासी तरुणांकरिता शहादा-धुळे विभाग येथे ५० उमेदवारांकरिता ६ महिन्याच्या सत्राकरिता (वार्षिक १०० उमेदवारांसाठी) आदिवासी चालक पदाचे प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित करून आदिवासी विद्यार्थ्यांना अवजड वाहन चालनाचे प्रशिक्षण व यशस्वी प्रशिक्षणाअंती चालक पदी नियुक्ती देणे " हा उपजीविका प्रकल्प कार्यान्वित करणेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे सोबत सामंजस्य करार करून योजना कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले.

ठराव क्र.१२ :- महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे मार्फत धुळे विभागातील शहादा येथे वाहन चालकप्रशिक्षणा बरोबरच संबंधीत प्रशिक्षणार्थींना इतर आधारभूत (Supportive) इतर प्रशिक्षण देण्यांत यावे. तसेच Refreshar प्रशिक्षण पण घेण्यांत यावे. अशा सुचना मा.अध्यक्ष यांनी केल्या.

विषय क्र १३ : National Institute of Naturopathy (NIN) Pune यांचे मार्फत आदिवासी युवक-युवतींना निसर्गोपचार प्रशिक्षण देणेबाबत..

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेमार्फत National Institute of Naturopathy (NIN) Pune यांच्या सहयोगाने आदिवासी युवक-युवतींसाठी Treatment Assistance Training Course (TATC) या एका वर्षाचा अभ्यासक्रम प्रशिक्षणासाठी मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागाकडील प्र.क्र.९१/का.०९ दि.२९.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचे कडून शबरी वित्त व विकास महामंडळास निधी वितरीत करण्यात यावा ठरले. त्यानुसार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचे कडून National Institute of Naturopathy (NIN) Pune यांचे करिता रु. ७.५० लक्ष निधी ऑनलाईन सोफ्टवेअर तयार करनेकामी व रक्कम रु. २.५ लक्ष १० विद्यार्थ्यांकरिता दरवर्षी एकूण रु. १० लक्ष आणि National Institute of Naturopathy (NIN) Puneयांचें अंतर्गत Ayush (GoI) रु. १३३ लक्ष निधी १० ब्याचेसकरिता असा एकूण रु. १४३/- लक्ष निधी शबरी महामंडळास वर्ग करण्यात आलेला आहे.

शबरी महामंडळाने दि. २५/०१/२०२१ रोजी National Institute of Naturopathy (NIN) Pune यांचे सोबत सामंजस्य करार (MoU) करून सदर योजनेची अंमलबजावणी सूर केलेली आहे.

Sr. No.	Name of Course	No of Hrs	Fees	Remark & Duration
1	TATC		Rs. 5000/- per month per student	Additional Sstipend of Rs.3000 per tirbal student for 12 months.
2	Certificate Course in Massage Techniques	360 Hrs	Rs. 15,000/-	Stipend of R. 3000/- per tribal student for 3 months.
3	Certificate Course in Fitness Training	60 Hrs.	Rs. 10,000/-	Stipend of R. 3000/- per tribal student for 15 days.
4	Registered Yoga Teacher Training Course	200 Hrs	Rs. 25,000/-	Stipend of Rs. 3000/- per tribal student for 2 months
5	Cerificate Course in Naturopathy Cooking	50 Hrs	Rs. 15,000/-	Stipend of Rs. 3000/- per tribal student for 15 days.

यांत आदिवासी युवक व युवतींना Treatment Assistance Training Course (TATC) या एका वर्षाचा अभ्यासक्रम प्रशिक्षणासाठी National Institute of Naturopathy (NIN) Pune यांचे कडून प्रती विद्यार्थी प्रती महा रु. ५०००/- व शबरी महामंडळाकडून रु. ३०००/- प्रमाणे शिष्यवृत्ती देण्याचे नियोजन आहे. जानेवारी २०२१ मध्ये या अभ्यासक्रमासाठी २० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन त्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच जानेवारी २०२२ पासून ११ विद्यार्थीनी व १४ विद्यार्थी असे एकूण २५ प्रशिक्षांर्थीची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यात ये आहे. सदर प्रशिक्षण आदिवासी आश्रम शाळा, मु.पो. गोहे बु. ता. आंबेगाव जी. पुणे येथे देण्यात येत आहे.

शबरी महामंडळाकडून National Institute of Naturopathy (NIN) Pune यांना सदर योजनेकरिता निधी देणेसाठी शबरी महामंडळाचे शाखा कार्यालय जुन्नर यांना एकूण रु.१६.७ लक्ष निधी वर्ग करण्यात आलेला आहे सध्यस्थितीत शबरी महामंडळाकडे रु. १२६.३ लक्ष इतका निधी शिल्लक आहे.

ठराव क्र.१३ :- National Institute of Naturopathy (NIN) Pune यांचे मार्फत आदिवासी युवक-युवतींना **आदिवासी आश्रम शाळा, गोहे बु. ता.आंबेगांव, जि.पुणे येथे देण्यांत आलेल्या प्रशिक्षणाला मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर योजने अंतर्गत TATC प्रशिक्षणा बरोबरच इतर प्रशिक्षण देण्याबाबतचे नियोजन करावे प्रशिक्षण दिल्यानंतर संबंधीत प्रशिक्षणार्थींना स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यासाठी मदत करावी. अशा सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.**

विषय क्र १४ : महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे यांचे मार्फत आदिवासी युवक-युवतींना पोलीस भरतीपूर्व व सुरक्ष रक्षक प्रशिक्षण देणेबाबत..

आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचेकडील पत्र TRTI/ESDP/25/2019-20 दि.25/09/201 नुसार महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मेस्को) या योजनेकरीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., यां रु.१००.०० लक्ष निधी प्राप्त झालेला आहे.

यानुसार महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांच्या दि.०३/१२/२०२१ रोजी सांमजस्य करार करण्यांत आलेला आहे. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ यांच्या महासैनिक प्रशिक्ष केंद्र बुलढाना यांच्या मार्फत ४० उमेदवारांचे ०१ बॅच याप्रमाणे माहे सप्टेंबर, २०२२ पर्यंत देण्यांत आलेल्या प्रशिक्षणाचे तपशिल खालीलप्रमाणे-

Sr. No.	Batch No	Duration		Strength of the batch
		From	To	
1	I	01-Feb-21	30-Apr-21	40
2	II	15-Jun-21	15-Sep-21	40
3	III	01-Jan-22	31-Mar-22	25
4	IV	01-Apr-22	30-Jun-22	40
5	V	01-Jul-22	30-Sep-22	40

सामंजस्य करारातील तरतुदीप्रमाणे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडून वरील ४ ब्याचेस साठी एकूण रु. ४५.३२८ लक्ष इतका निधी वर्ग करण्यात आलेला आहे. उर्वरित रु.५४.६७ लक्ष निधी शबरी महामंडळाकडे शिल्लक आहे.

सांमजस्य कराराप्रमाणे कमांडट, महासैनिक प्रशिक्षण केंद्र बुलढाना यांनी माहे ऑक्टोंबर, २०२२ पासुन सुरु होणाऱ्या प्रशिक्षणासाठी निवड करण्यांत आलेल्या ७० प्रशिक्षणार्थींच्या यादीला मान्यता मिळणेची विनंती केलेली होती. त्यानुसार शबरी महामंडळाकडून सदर यादीस मान्यता देऊन प्रशिक्षण विहित वेळेत सुरू करण्यात यावे असे कळविण्यात आलेले आहे.

ठराव क्र.१४ :- महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे यांचे मार्फत आदिवासी युवक-युवतींना पोलीस भरतीपूर्व व सुरक्षा रक्षक प्रशिक्षण **देणेसाठी घेण्यांत आलेल्या पाच बॅचेस ला मंजुरी देऊन पुढील नियोजनास मंजुरी देण्यांत येत आहे. सदर प्रशिक्षण देणेसाठी प्रशिक्षणार्थी निवड करते वेळी त्यांचे सर्व कागदपत्रांची तपासणी करुनच त्यांची निवड करावी याबाबतच्या सुचना महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पूणे, यांना देण्यांत याव्यात. याबाबत मा.अध्यक्ष यांनी निर्देश दिले.**

सुचक :- मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक

अनुमोदक :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

विषय क्र १५ : केंद्र शासनाच्या जनजाती कार्य मंत्रालय (Ministry of Tribal Affairs) यांचे मार्फत विशेष केंद्रीय सहाय्य (SCA – Special Central Assistance), आदिम जमाती विकास (PVTGs/CCD), भारतीय संविधानाच्या परिच्छेद २७५(१) (Provision under Article 275(1)), MSP for MFP व ट्राय फेड (TRIFED) अंतर्गत विविध योजनासाठी निधी प्राप्त करनेकामी प्रस्ताव सादर करणेबाबत...

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक याची दिनांक १५ जानेवारी १९९९ रोजी कंपनी कायदा १९५६ अंतर्गत स्थापना झाली .शबरी महामंडळ नाशिक, जुन्नर, जव्हार, नंदुरबार, यावल, यवतमाळ, किनवट, देवरी, धारणी, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली येथे असलेल्या शाखा कार्यालयांच्या माध्यमातून आदिवासींच्या उपजीविका वृद्धी करणेसाठी विविध सहाय्य योजना राबवते ."जन जल जंगल जमीन विकासाद्वारे आदिवासींचे सक्षमीकरण "हा उद्देश घेऊन शबरी महामंडळ कार्य करत आहे .शबरी महामंडळाचा आदिवासी समुदायाबरोबर त्यांचे पारंपारिक उपजीविका मुख्यतः कृषी, कृषी सलग्न व गौण वनौपज आधारित उपजीविका वृद्धी साठी कार्य करण्याचा मानस आहे .

शबरी महामंडळाने सन २०१९-२० पासून विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत उपजीविका आधारित विविध उपक्रम सुरू केले आहेत . सदर उपक्रम राबवत असतांना आदिवासी बहुल भागातील ग्रामीण आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी अजून जास्त विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहेत असे वाटते. याकरिता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाच्या जनजाती कार्य मंत्रालय (Ministry of Tribal Affairs) यांचे मार्फत विशेष केंद्रीय सहाय्य (SCA – Special Central Assistance), आदिम जमाती विकास (PVTGs/CCD), भारतीय संविधानाच्या परिच्छेद २७५(१) (Provision under Article 275(1)), MSP for MFP व ट्राय फेड (TRIFED) अंतर्गत विविध योजनासाठी निधी प्राप्त करून घेणेसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडून शासनास योजनानिहाय प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

करिता सदर योजनानिहाय प्रस्ताव सादर करणेसाठी मा. संचालक मंडळाची अनुमती मिळावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

ठराव क्र.१५ :- केंद्र शासनाच्या जनजाती कार्य मंत्रालय (Ministry of Tribal Affairs) यांचे मार्फत विशेष केंद्रीय सहाय्य (SCA – Special Central Assistance), आदिम जमाती विकास (PVTGs/CCD), भारतीय संविधानाच्या परिच्छेद २७५(१) (Provision under Article 275(1)), MSP for MFP व ट्राय फेड (TRIFED) अंतर्गत विविध योजनासाठी निधी प्राप्त **करणेसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक यांचे मार्फत शासनास प्रकल्प प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.**

विषय क्र.१६ : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक येथे बाहय स्त्रोत यंत्रणाद्वारे मनुष्यबळ नेमणूकीस कार्योतर मंजुरी बाबत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत विविध कर्ज योजना राबविण्यांत येतात. सद्यस्थितीत शबरी महामंडळात मंजुर ७२ पदांपैकी १५ कर्मचारी कार्यरत आहेत. अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने कार्यालयीन कामकाज करतांना अडचणी येत असल्याने शिपाई या संवर्गाचे ०३ अकुशल व ०१ कुशल (लिपीक / टंकलेखक) असे एकूण ०४ कर्मचारी उपलब्ध करुन मिळणेबाबत बाहय स्त्रोताद्वारे नेमणूकीकामी संस्था / कंपनी नियुक्ती करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/९०८/२०२२ नाशिक दि.१५/०२/२०२२ अन्वये दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत माहिती जनसंपर्क कार्यालय, मुंबई यांना कळविण्यांत आलेले होते. त्यानुसार दि.१८ फेब्रुवारी २०२२ रोजी महाराष्ट्र राज्यातील सकाळ दैनिक वर्तमानपत्रात राज्यातील सर्व आवृत्तीत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदरकामी अपेक्षीत प्रतिसाद न मिळाल्याने या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/९४२/२०२२ नाशिक दि.०२/०३/२०२२ अन्वये पुन:श्च दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत माहिती जनसंपर्क कार्यालय, मुंबई यांना कळविण्यांत आलेले होते. त्यानुसार दि.४ मार्च २०२२ रोजी महाराष्ट्र राज्यातील सकाळ दैनिक वर्तमानपत्रात राज्यातील सर्व आवृत्तीत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

जाहिरातीच्या अनुषंगाने बाहय स्त्रोताद्वारे नेमणूकीकामी इच्छुक संस्था / कंपनी यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी केली असता शांती एन्टरप्राईजेस, Old STN Wadi, देवळाली कॅम्प, नाशिक यांचे दर कुशल कर्मचारी करीता ६५०/- व अकुशल कर्मचारी करीता ५८०/- प्रमाणे सादर केले असुन सदर दर सर्वात कमी असल्याने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक येथे लिपीक नि संगणक चालक (कुशल) या संवर्गातील ०१ व शिपाई (अकुशल) या संवर्गातील ०३ पदांकरीता मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत .मुख्य कार्यालयाचे आदेश क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/१०८३/२०२२ नाशिक दि.३१/०३/२०२२ अन्वये शांती एन्टरप्राईजेस, नाशिक यांना पुरवठा आदेश देण्यांत आलेला आहे. व सदरकामी शांती एन्टरप्राईजेस नाशिक यांचेशी दि.१८/०४/२०२२ रोजी करारनामा करण्यांत आलेला आहे.

शांती एन्टरप्राईजेस नाशिक, यांचेकडून बाहयस्त्रोताद्वारे पुरविण्यांत येणाऱ्या मनुष्यबळाच्या मंजुर दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	आवश्यक सेवा	प्रति महिना	शेरा
१	लिपीक नि संगणक चालक (कुशल)	रुपये १९,५००/-	मुख्य कार्यालय नाशिक येथे मनुष्यबळ संख्या-०१ निश्चित करण्यांत येत आहे.
२	शिपाई (अकुशल)	रुपये १७,४००/-	मुख्य कार्यालय नाशिक येथे मनुष्यबळ संख्या-०३ निश्चित करण्यांत येत आहे.

त्याअनुषंगाने शांती एन्टरप्राईजेस नाशिक यांनी कार्यालयास दि.१६/०४/२०२२ पासुन शिपाई (अकुशल) या संवर्गातील ०३ व लिपीक नि संगणक चालक (कुशल) या संवर्गातील ०१ कर्मचारी उपलब्ध करुन दिलेले आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	संवर्ग
१	गायत्री बखुरे	शिपाई (अकुशल)
२	अनिता बखुरे	शिपाई (अकुशल)
३	सत्वेंदर सिंह मलेनदर पोथिवाल	शिपाई (अकुशल)
४	कोमल सुरेश साबळे	लिपीक नि संगणक चालक (कुशल)

करीता उपरोक्तप्रमाणे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक येथे बाहय स्त्रोत यंत्रणाद्वारे मनुष्यबळ नेमणूकीस कार्योतर मंजुरी मिळावी. याबाबत विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

ठराव क्र.१६ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक येथे बाहय स्त्रोत यंत्रणाद्वारे मनुष्यबळ नेमणूक करणेकामी करण्यांत आलेल्या प्रक्रीयेस कार्योतर मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
अनुमोदक :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

विषय क्र.१७ : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक येथे वरिष्ठ सल्लागार व सल्लागार यांची मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन सविनय सादर करण्यांत येते की, शासन निर्णय क्र.केंद्रिय-२०१९/प्र.क्र.६३/का-१९ मंत्रालय, मुंबई दि.०५ ऑगस्ट, २०१९ अन्वये सन २०१९-२० करीता विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत प्राप्त निधी वितरणास मान्यता व कार्यारंभ आदेश देण्याबाबत मंजुरी दिलेली आहे.

राज्य शासनाने सन २०१९-२०२० करीता या आर्थिक वर्षाकरीता विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत केंद्र शासनास विविध योजनांचे प्रस्ताव सादर केले होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने जनराज्यजाति कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथे प्रकल्प मूल्यमापन समितीची (Project appraisal committee - PAC) बैठक दिनांक - १२/०२/२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीत केंद्र शासनाने विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत एकुण रक्कम रु.११५२९.०९ लक्ष निधीच्या प्रस्तावांना मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर मान्यतेनुसार वरील संदर्भीय शासन निर्णयान्वये योजना क्र.६ -"Organizing FPO's of 15000 Farmers for processing distribution branding and retailing" या योजनेसाठी रक्कम रु.२४४०.०० लक्ष इतका निधी व योजना क्र.२२ -"CCD NGO- Formation of FPOs in Yavatmal District so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently or better price realistion" या योजनेसाठी रक्कम रु.५००.०० लक्ष इतका निधी सन २०१९-२०२० करीता मंजुर करण्यात आलेला आहे. सदरचा निधी वितरीत केलेला नाही.

संदर्भिय शासन पत्र क्र.लेखाप-२०१८/प्र.क्र.९३/का.३, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०५/१०/२०१८ अन्वये सार्वजनिक उपक्रम समितीने शबरी महामंडळाचे सशक्तीकरण व पुर्नरचना यासाठी तज्ञ समिती स्थापन करुन आवश्यक बदल व सुधारणा करण्यासाठी सल्लागार नियुक्त करुन कामकाजात सुधारणा करण्याबाबत सुचित केले आहे. तसेच सदरचे मानधन तत्वावर सल्लागार नियुक्ती करणेकामी संचालक मंडळ सभा दि.१५/०१/२०१९ रोजी विषय क्र.३ व ४ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.

त्यास अनुसरुन शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा अंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी, कृषि विकास, विपणन, प्रक्रीया, पुरवठा व साठवणूक या बाबीचे सखोल ज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाची जोड असणाऱ्या अनुभवी १ वरिष्ठ सल्लागाराची मुख्य कार्यालयाचे आदेश क्र. जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/४१२/२०१९ दि.१४/११/२०१९ अन्वये रुजू दि.०२/०३/२०२० ते दि.०१/०३/२०२१ पर्यंत १ वर्ष कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मासिक मानधन तत्वावर रक्कम रु.१,३०,०००/- प्रमाणे व १ सहाय्यक सल्लागाराची मुख्य कार्यालयाचे आदेश क्र. जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/४११/२०२० दि.१४/११/२०१९ अन्वये रुजू

दि.२८/०५/२०२० ते दि.२७/०५/२०२१ पर्यंत १ वर्ष कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर मासि
रक्कम रु.७५,०००/- प्रमाणे नेमणूक करण्यांत आलेली आहे. दि.१६/०२/२०२२ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंड
सभेतील ठराव क्र. २२ अन्वये उपरोक्त नमुद केल्यानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळात वरि
सल्लागार / सहाय्यक सल्लागार नेमणूकीबाबतच्या सर्व प्रक्रीयेला सर्वानुमते मंजुरी देण्यांत आलेली आहे.

उपरोक्त नमुद केल्यानुसार वरिष्ठ सल्लागार व सल्लागार यांचे नेमणूक आदेश संपुष्टात आल्याने खालील
आदेशान्वये वरिष्ठ सल्लागार यांना मुख्य कार्यालयाचे आदेश क्र. जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/१४५९/२०
दि.०१/०३/२०२१ अन्वये रुजू दि.०२/०३/२०२१ ते दि.०१/०३/२०२२ पर्यंत १ वर्ष कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुप
मासिक मानधन तत्वावर रक्कम रु.१,३०,०००/- प्रमाणे नेमणूक देण्यांत आली आहे. सदर नेमणूक दि.०१/०३/२०
रोजी संपुष्टात येत आल्याने मुख्य कार्यालयाचे आदेश क्र. जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/९४७/२०
दि.०४/०३/२०२२ अन्वये रुजू दि.०४/०३/२०२२ ते दि.०३/०२/२०२३ पर्यंत १ वर्ष कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुप
मासिक मानधन तत्वावर रक्कम रु.१,३०,०००/- प्रमाणे नेमणूक देण्यांत आलेली आहे.

तसेच १ सहाय्यक सल्लागाराची नियुक्ती दि.२७/०५/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने मुख्य कार्यालय
आदेश क्र. जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/१५५/२०२१ दि.३१/०५/२०२१ अन्वये रुजू दि.३१/०५/२०२१
दि.३०/०५/२०२२ पर्यंत १ वर्ष कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर मासिक रक्कम रु.७५,०००
प्रमाणे नेमणूक करण्यांत आलेली आहे.

करीता उपरोक्त नमुद केल्यासनुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळात वरिष्ठ सल्लागार
सहाय्यक सल्लागार नेमणूकीबाबतच्या सर्व प्रक्रीयेला कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचाल
यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१७ :-शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक येथे वरिष्ठ सल्लागार व सल्लाग
यांची मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करणेकामी करण्यांत आलेल्या प्रक्रीयेस कार्योत्तर मंजु
देण्यांत येत आहे.**

सुचक :- मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
अनुमोदक :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

विषय क्र.१८ :- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना प्रगती अहवाल सादर करणे.

शासन निर्णय क्रमांक-शाहमी-२०१९/प्र.क्र.५७/अर्थबळ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०९ सप्टेंबर, २०१
अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ मर्या., न
दिल्ली (NSTFDC., New Delhi) पुरस्कृत योजनांसाठी रुपये ५० कोटी शासन हमी पुढील पाच वर्षासाठी मिळालेली
आहे.

NSTFDC., New Delhi यांचेकडील पत्र क्र.NSTFDC/COORD/३४/०१/VOL.IV/२०६ Date
२०/०५/२०१९ अन्वये एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी
सन २०१९-२० करीता रक्कम रु.२४०८.०० लक्ष निधीची तरतुद करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार सद्यस्थितीत एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजनांसाठी
एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून दि.३०/०३/२०२० रोजी ५०% रक्कम रु.११.६७ कोटी (६८७

लाभार्थींकरीता) निधी वर्ग केल्याबाबत पत्र क्र.No.NSTFDC/PROJ-L/MAH/६३३/१९/६८५ Date-०३/०६/२०२० अन्वये या कार्यालयास कळविण्यांत आलेले आहे.

सर्वत्र कोविड-१९ सदृश परिस्थिती निर्माण झाल्याने सर्वत्र लॉकडाऊन घोषित झाल्यामुळे लॉकडाऊन शिथील झाल्यानंतर विविध कर्ज योजनांसाठी अर्ज सादर करण्यासाठी वेळोवेळी जाहिरात प्रसिद्ध करुन दि.३१/०१/२०२१ पर्यंत अर्ज सादर करण्यांस कळविण्यांत आले होते. परिणामी कर्ज वाटपाच्या कार्यवाहीस विलंब झाल्याने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून कर्ज वाटपासाठी या कार्यालयास प्राप्त झालेला निधी परत करणेबाबत दि.२१/०५/२०२१ व दि.१८/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यांत आले होते. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र.२२०/२०२१ दि.२५/०६/२०२१ व पत्र क्र.४९८/२०२१ दि.०८/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर कर्ज योजना वाटपाबाबत एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना वस्तुस्थिती अवगत करुन कर्ज योजना राबविणेकामी मुदतवाढ मिळणेबाबत कार्यालयाने विनंती केली होती. वाटपाअभावी निधी परत जाऊ नये म्हणून कार्यालयाने ज्या शाखा कार्यालयांचे प्रस्ताव प्रथम प्राप्त होतील, अशा शाखा कार्यालयांना कर्ज मंजुर करण्याची कार्यवाही सुरु करुन इच्छुक व पात्र लाभार्थ्यांना एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांचा लाभ देण्यांत आला आहे.

एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून उर्वरित ५०% निधी प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा सुरु असुन एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे दि.१३/०४/२०२२ रोजी ई-मेल द्वारे कळविल्यानुसार या कार्यालयाने पत्र क्र.No.SAVVM/Project/९६/२०२२ Nashik Date-११/०५/२०२२ अन्वये इच्छुक व पात्र एकूण ३०५ लाभार्थ्यांची यादी एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडे सादर केलेली आहे. सदरचा निधी प्राप्त झाल्यांनतर संबंधित लाभार्थ्यांना कर्ज मंजुर करुन कर्ज वाटपाची कार्यवाही करण्यांत येईल.

सद्यस्थितीत एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त रक्कम रु.११,७५,५६,०००/- (६८७ लाभार्थींकरीता) कर्ज वाटपाचा तपशिल खालीलप्रमाणे-

	योजनेचे नाव	NSTFDC यांचेकडून प्राप्त निधी	शाखा कार्यालय निहाय मंजुर कर्ज वाटप निधी रक्कम (रु.लक्ष)										कर्ज वाटप रक्कम
			धारणी	जव्हार	यवतमाळ	देवरी	किनवट	जुन्नर	नंदुरबार	नाशिक	नागपूर	गडचिरोली	यावल	
	महिला सशक्तीकरण (रु.१ लक्ष)	४३२.००	४२.३०	८४.६०	४२.३०	२.७०	१९.८०	७३.८०	४४.१०	८९.१०	६.३०	४.५०	२२.५०	४३२.००
	लहान उद्योगधंदे (रु.२ लक्ष)	१६७.४०	१६.२०	४८.६०	१९.८०	७.२०	१४.४०	१२.६०	१२.६०	१०.८०	९.००	९.००	७.२०	१६७.४०
	हॉटेल ढाबा व्यवसाय (रु.५ लक्ष)	९९.००	१३.५०	२७.००	१३.५०	४.५०	९.००	४.५०	४.५०	१३.५०	००	४.५०	४.५०	९९.००
४	स्पेअर पार्ट / गॅरेज / ऑटो वर्क शॉप (रु.५ लक्ष)	९९.००	९.००	१३.५०	१३.५०	४.५०	४.५०	४.५०	१८.००	१३.५०	००	९.००	९.००	९९.००
५	प्रवासी वाहन व्यवसाय	११४.६६	१६.३८	१६.३८	००	८.१९	८.१९	२४.५७	१६.३८	८.१९	००	८.१९	८.१९	११४.६६
६	स्वयंसहाय्यता बचतगट (रु.५ लक्ष)	२४७.५०	२२.५०	४०.५०	३१.५०	४.५०	४.५०	६३.००	२२.५०	१८.००	४.५०	९.००	२७.००	२४७.५०
७	मोहा मशरुम बिस्किट व्यवसाय (रु.२० लक्ष)	१६.००	०	०	०	१६.००	०	०	००	००	००	०	०	१६.००
	एकूण	११७५.५६	११९.८८	२३०.५८	१२०.६०	४७.५९	६०.३९	१८२.९७	११८.०८	१५३.०९	१९.८०	४४.१९	७८.३९	११७५.५६

करीता उपरोक्त प्रमाणे एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना वाटपाची कार्यवाही केलेली असुन या कार्यालयाचे पत्र क्र. १)No.SAVVM/Project/Adm/३११/२०२१ Nashik Date-१२/०७/२०२१
२) No.SAVVM/Project/Adm/१०४५/२०२२ Nashik Date-२१/०३/२०२२
३) No.SAVVM/Project/Adm/९४/२०२२ Nashik Date-११/०५/२०२२
४) No.SAVVM/Project/Adm/३१८/२०२२ Nashik Date-१५/०७/२०२२
५)No.SAVVM/Project/Adm/४३७/२०२२ Nashik Date-२४/०८/२०२२ अन्वये एकूण रक्कम रु.११,७५,५६,०००/- इतक्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले असुन मा.संचालक मंडळाचे अवलोकनार्थ विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

ठराव क्र.१८:- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना प्रगती अहवाल सादर करण्यांत आला असुन सदर कर्ज वाटप प्रक्रीयेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच यापुढे एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडील प्राप्त होणाऱ्या निधीवर अवलंबून न राहता राज्य शासनाकडून नवीन योजना तयार करुन निधी मिळणेकामी स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

विषय क्र.१९:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व १२ शाखा कार्यालयांसाठी १६ संगणक संच (All in One) व प्रिंटर (Multifunctional) खरेदी करणेबाबत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व १२ शाखा कार्यालयांसाठी संगणक संच (All in One) व प्रिंटर (Multifunctional) ची आवश्यकता असल्याने GeM पोर्टल वर संगणक व प्रिंटर खरेदी करणेकामी यापुर्वी ५ वेळेस ई निविदा (Bid) प्रसिद्ध करण्यांत आलेली आहेत. तथापि प्रत्येक वेळेस निविदाधारकांनी अपेक्षीत प्रतिसाद न दिल्याने तांत्रिक कारणास्तव ई-निविदा रद्द करण्यांत आलेल्या आहेत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक अंतर्गत महाराष्ट्र राज्यात एकूण १२ शाखा कार्यालय आहेत. सद्यस्थितीत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक येथे प्रशासन विभागात ०१ व वित्त विभागात ०१ संगणक चालु स्थितीत असुन सदर संगणक देखील कालबाहय झाले असल्याने सदर संगणकावर कामकाज करतांना अडचणी निर्माण होत आहेत. तसेच शाखा कार्यालयांमध्ये देखील संगणकाची आवश्यकता असल्याने शाखा कार्यालयांकडून वारंवार संगणकाची मागणी करण्यांत येत आहे.

उपरोक्त नमुद बाबींचा विचार करता तसेच दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची निकड लक्षात घेता मुख्य कार्यालय नाशिक व १२ शाखा कार्यालयांमध्ये संगणकाची तातडीची आवश्यकता असल्याने म.रा.सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांचेकडे संगणक व प्रिंटर खरेदी प्रक्रीया सुरु असुन म.रा.सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेकडून प्रसिद्ध केलेली GeM पोर्टलवरील Bid No.GEM/२०२२/B/२१५३४८ दि.०५.०५.२०२२ अन्वये GeM पोर्टल वरुन ई निविदा (Bid) प्रसिद्ध करण्यांत आलेली असुन त्यामधे अंतिम ठरलेले L१ बिडर M/s.Pioneer, Office No.१३, १st Floor, Aditya Centeegra, F.C. Road, Beside IDFC Bank, Shivaji Nagar, Pune-४११०१६ यांचे कडून संगणक व प्रिंटर खरेदी करणेबाबत कार्यालयाने निर्णय घेतलेला आहे.

त्यानुसार म.रा.सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक येथे पुरवठा केलेल्या संगणक संच (All in One) च्या मंजुर दरानुसार / अटी शर्तीनुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक येथे १६ संगणक संच (All in One) पुरवठा करणेबाबत या कार्यालयाचे पत्र

क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/३८८/२०२२ नाशिक दि.०४/०८/२०२२ अन्वये पुरवठा आदेश देण्यांत आलेला आहे. त्यानुसार M/s.Pioneer, Pune यांनी दि.१०/०९/२०२२ रोजी कार्यालयास १६ संगणक संच (All in One) पुरवठा केलेले आहे.

तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व १२ शाखा कार्यालयांसाठी प्रिंटर (Multifunctional) ची आवश्यकता असल्याने GeM पोर्टल वरुन प्रिंटर खरेदी करणेकामी यापुर्वी ५ वेळेस ई निविदा (Bid) प्रसिद्ध करण्यांत आलेली असुन देखील अपेक्षीत प्रतिसाद मिळालेला नसल्याने सदर निविदा रद्द करण्यांत आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची निकड लक्षात घेता मुख्य कार्यालय नाशिक व १२ शाखा कार्यालयांमध्ये प्रिंटरची तातडीची आवश्यकता असल्याने दि.२४/०८/२०२२ रोजीचे मंजुर टिपणीनुसार शवरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व १२ शाखा कार्यालयांसाठी १६ प्रिंटर (Multifunctional) खरेदी करणेकामी पुन्हा नव्याने GeM पोर्टल वरुन खरेदी करण्यांस मंजुरी देण्यांत आलेला आहे.

GeM पोर्टल वरुन खरेदी प्रक्रीया राबवितांना रक्कम रु.५.०० लक्ष पर्यंत Product Compared करुन खरेदी करता येते. त्यानुसार दि.०५/०९/२०२२ रोजी Compared पद्धतीने GeM पोर्टल वरुन पिंटर Product Compared करण्यांत आलेले असुन तपशिल खालीलप्रमाणे-

अ.क्र.	कंपनीचे नाव	नग	दर	प्राप्त दरानुसार प्रति नग किंमत	शेरा
१	**Made.ly Multifunctional Machines Mfm**	१६	४,८०,०००/-	३०,०००/-	L-१
२	**Brother Multifunctional Machines Mfm**	१६	५,३६,०००/-	३३,५००/-	L-२
३	**Cannon Multifunctional Machines Mfm**	१६	६,८५,९०४/-	४२,८६९	L-३

उपरोक्त तपशिलात नमुद केल्यानुसार GeM पोर्टल वरील पिंटर Compared Product Details नुसार L१ निविदाधारकाने प्रति प्रिंटर संच रुपये ३०,०००/- प्रमाणे दर सादर केलेले असुन १६ प्रिंटर (Multifunctional) साठी एकूण रक्कम रुपये ४,८०,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

करीता उपरोक्त प्रमाणे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व १२ शाखा कार्यालयांसाठी १६ संगणक संच (All in One) व प्रिंटर (Multifunctional) GeM पोर्टल वरुन खरेदी करणेकामी केलेल्या प्रक्रीयेस मान्यता मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

ठराव क्र.१९ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व १२ शाखा कार्यालयांसाठी १६ संगणक संच (All in One) व १६ प्रिंटर (Multifunctional) खरेदी करणेकामी करण्यांत आलेल्या प्रक्रीयेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
अनुमोदक :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

विषय क्र.२० :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,मुख्य कार्यालय नाशिक येथे कार्यालयीन नुतनीकरण / दुरुस्ती करणेबाबत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना झाल्यापासुन महामंडळाचे मुख्य कार्यालय आदिवासी विकास भवन मधील तीसऱ्या मजल्यावर आहे. सदर कार्यालयात स्थापनेपासुन आजतागायत कार्यालयाचे नुतनीकरण / कार्यालयाची दुरुस्ती करण्यात आलेले नाही. परिणामी कार्यालयीन कामकाज करतांना अडचणी निर्माण होतात. तसेच कार्यालयात अडगळीचा सामान देखील असल्याने कार्यालयाचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्र.शविम/२०१२/प्र.क्र.२३२/का.३ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १४/०३/२०१३ व शासन पत्र क्रमांक शविम-२०१२/प्र.क्र.२३२/का.३ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२६ मार्च, २०१३ अन्वये शाखा कार्यालयांचे फर्निचर व इतर साहित्य खरेदी करणे कामी रक्कम रु.२०.०० लक्ष भागभांडवल निधी अंतर्गत प्राप्त झालेला असुन सदरचा निधी सद्यस्थितीत शिल्लक आहे. सदर शासन पत्रान्वये सदरच्या निधीमधुन शाखा कार्यालयांना कार्यालयीन फर्निचर व इतर साहित्य खरेदी करणेकामी नमुद करण्यांत आलेले आहे. तथापि शबरी महामंडळाचे शाखा कार्यालय आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यालयात कार्यरत आहेत. त्यामुळे सदर शाखा कार्यालयांचे नुतनीकरण करण्यांत आलेले नसल्याने सदरचा शिल्लक निधी मुख्य कार्यालय नाशिक येथे फर्निचर व इतर साहित्य खरेदी प्रक्रीया तसेच नुतनीकरण करणेकामी वापरण्यांत यावा, असे कार्यालयाचे मत आहे.

त्याअनुषंगाने या कार्यालयात तांत्रिक सल्लागार / वास्तुविशारद यांची नेमणूक झालेली नसल्याने म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळाकडील तांत्रिक सल्लागार नेममणूक आदेश क्र.जा.क्र.आविम/प्रशा/जन/तां.स.ने./४७८०/२०१४ नाशिक दि.०८ जानेवारी, २०१४ अन्वये आदिवासी विकास महामंडळाकडून नेमणूक करण्यांत आलेल्या मे.मगर जायभावे असोसिएट्स, १६, पहिला मजला, अ इमारत, वसंत मार्केट, कॅनडा कॉर्नर, नाशिक यांचेकडून कार्यालयीन नुतनीकरणाचा आराखडा, अंदाजपत्रक तयार करुन घेणेकामी या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/९१०/२०२२ नाशिक दि.१५/०२/२०२२ अन्वये कळविण्यांत आले होते. त्याअनुषंगाने मे.मगर जायभावे असोसिएट्स, नाशिक यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.अ.वि./श.म./कार्या/अंदाजपत्रक-१ दि.१०/०३/२०२२ अन्वये मे.मगर जायभावे असोसिएट्स, नाशिक यांनी एकूण रक्कम रुपये ९,७३,१५०/- मात्र (रक्कम रुपये नऊ लक्ष त्र्याहत्तर हजार एकशे पन्नास मात्र) चे अंदाजपत्रक या कार्यालयास सादर केलेले आहे. (सदर अंदाजपत्रक सोबत अवलोकनार्थ सादर केलेले आहे.)

करीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व शाखा कार्यालय नाशिक कार्यालयाचे नुतनीकरण / कार्यालयाची दुरुस्ती करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

ठराव क्र.२० :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,मुख्य कार्यालय नाशिक / शाखा कार्यालय नाशिक येथे कार्यालयीन नुतनीकरण / दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक

अनुमोदक :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

विषय क्र.२१ : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या बोधचिन्हास (Logo) मान्यता मिळणेबाबत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सद्यस्थितीत बोधचिन्ह (Logo) अस्तित्वात नसल्याने शासकीय कार्यालयांशी पत्रव्यवहार करतांना बोधचिन्ह (Logo) वापरता येत नाही. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे स्वतंत्र बोधचिन्ह (Logo) असावे असे कार्यालयाचे मत आहे.

सबब मागील संचालक मंडळ सभेत (दि.१६/०२/२०२०२१) दिलेल्या निर्देशाप्रमाणे Muktagiri & Sons painters, Mumbai या संस्थेकडून बोधचिन्ह (Logo) तयार करण्यांत आलेले असुन सदर बोधचिन्ह (Logo अवलोकनार्थ सादर करण्यांत आले.

सदर बोधचिन्हामधून एक अंतिम करण्यासाठी मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी विनंती केली.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

ठराव क्र.२१ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी खालील बोधचिन्ह (Logo) सर्वानुमते अंतिम करण्यांत येत आहे.

Logo Concept: 2

Formation of a traditional circle of Warli art

A pathway towards Maharashtra indicating the tribal community a way ahead for their future.

The logo is kept in an earthy colour inspired by "GERU". Also the simplicity of having the logo in one colour means even if a black and white print out is taken using this colour, the contrast is still maintained

विषय क्र.२२: सन २०२०-२१ या वर्षाकरीता अधिकारी / कर्मचारी यांना बोनस/सानुग्रह अनुदानास कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत. तसेच सन २०२१-२२ या वर्षाकरीता अधिकारी / कर्मचारी यांना बोनस/सानुग्रह अनुदानास मंजुरी मिळणेबाबत.

शासन निर्णय १३ डिसेंबर, १९९९ अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचे कर्मचारी सेवानियम शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास लागू आहे. त्याअनुरोधाने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या अधिकारी / कर्मचारी यांना ज्या धर्तीवर बोनस व सानुग्रह अनुदान अदा करण्यात येते त्याच धर्तीवर शबरी महामंडळाचे कर्मचाऱ्यांना सुध्दा बोनस व सानुग्रह अनुदान अदा करण्यात येते.

त्यानुसार बोनस अधिनियमातील तरतुदीनुसार पात्र कर्मचाऱ्यांना ८.३३% प्रमाणे रुपये ३५००/- बोनस सन २०२०-२१ या वर्षासाठी मंजुर करण्यांत आलेला आहे. त्यास कार्योत्तर मंजुरी मिळावी. तसेच सन २०२१-२२ या वर्षासाठी शबरी महामंडळाचे पात्र कर्मचाऱ्यांना कमाल रुपये ३५००/- बोनस अदा करण्यास मंजुरी मिळावी.

तसेच सन २०२०-२१ या वर्षासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे पात्र अधिकारी / कर्मचाऱ्यांना रु.६०००/- सानुग्रह अनुदान मंजुर करण्यांत आलेले आहे. त्यांस कार्योत्तर मंजुरी मिळावी. तसेच सन २०२१-२२ मध्ये संभाव्य रु.३५०.०० लक्ष नफा अपेक्षित असल्यामुळे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांना रु.६०००/- इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

ठराव क्र.२२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील कार्यरत व पात्र अधिकारी / कर्मचारी यांना सन २०२०-२१ या वर्षाकरीता बोनस/सानुग्रह अनुदानास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच सन २०२१-२२ या वर्षाकरीता कार्यरत व पात्र अधिकारी / कर्मचारी यांना बोनस/सानुग्रह अनुदानास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
अनुमोदक :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

आयत्या वेळेचा विषय क्र.१:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या भाग भांडवल रक्कम रु.१००.९७ लक्षचे भाग भांडवल प्रमाणपत्र केंद्र शासनास देणे बाबत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे.

महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१०० कोटी वरुन रु.२०० कोटी इतके करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

यापैकी ५१% भाग भांडवल वर्गणी राज्य शासनाची राहिल तर ४९% भाग भांडवल केंद्र शासनाकडून उभारावयाचे आहे. त्या अनुसार राज्य शासनाने रु.१०२ कोटी तर केंद्र शासनाने रु. ९८ कोटी इतके भाग भांडवल भरणा करावयाचे आहे.

उपरोक्त निर्णयानुसार आज अखेर पर्यंतची अंदाजपत्रकात केलेली मागणी, शासन तरतूद, महामंडळास प्राप्त रक्कम व कमी प्राप्त भागभांडवलाचा तपशिल खालील प्रमाणे.

(रुपये लाखात)

सन	५१% राज्य शासन हिस्सा				४९% केंद्र शासन हिस्सा				
	शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रकिय मागणी	शासनाने केलेली तरतूद	**महामंडळास प्राप्त रक्कम**	कमी प्राप्त रक्कम	शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रकिय मागणी	शासनाने केलेली तरतूद	**महामंडळास प्राप्त रक्कम**	कमी प्राप्त रक्कम	**महामंडळास एकुण प्राप्त रक्कम**
१९८-१९९९	५००.००	५००.००	५००.००	-	-	-	-	-	५००.००
१९९-२०००	१०००.००	१०००.००	१०००.००	-	-	-	-	-	१०००.००
०००-२००१	-	-	-	-	-	-	-	-	-
००१-२००२	-	-	-	-	-	-	-	-	-
००२-२००३	-	-	-	-	-	-	-	-	-
००३-२००४	७१७.१६	७१७.१६	७१७.१६	-	५२.००	५२.००	५२.००	-	७६९.१६
००४-२००५	२०००.००	११०.००	११०.००	१८९०	१०५.००	-	-	१०५.००	११०.००
००५-२००६	३८९०.००	२५०.००	-	३८९०	-	-	-	-	-
००६-२००७	५८९०.००	३७७.३२	५०.००	५८४०	१५३.००	-	-	१५३.००	५०.००
७-२००८	७८४०.००	४००.००	४००.००	७४४०	३८४.००	-	-	३८४.००	४००.००
००८-२००९	४६.००	०.००	४६.००	७४४०	३८४.००	-	-	३८४.००	४६.००
००९-२०१०	४००.००	४००.००	४००.००	११५०	-	-	-	-	४००
१०-२०११	२६५०.००	१५००.००	१५००.००	१५०	-	-	-	-	१५००.००
०११-२०१२	१०००.००	८५०.००	८५०.००	१५०	-	३००.००	३००.००	-	११५०.००
१२-२०१३	२२९६.००	१०००.००	८००.००	-	४५२७.००	-	-	४५२७.००	८००.००
१३-२०१४	१०००.००	१०००.००	४११.००	५८९.००	१०००.००	-	-	१०००.००	४११.००
१४-२०१५	१०००.००	१०००.००	५७५.००	४२५.००	१०००.००	-	-	-	-
१५-२०१६	-	१०००.००	००.००	-	-		००.००		००.००
१६-२०१७	१०००.००	१०००.००	-			-	-	-	-
१७-२०१८	१०००.००	१०००.००	-	-	६७.१८	-	-	-	-
१८-२०१९	१०००.००	१०००.००	१०००.००	-	-	-	-	-	-
१९-२०२०	१०००.००	१०००.००	-	-	-	-	१००.९७	-	१००.९७
२०-२०२१	१०००.००	१०००.००	-	-	-	-	-	-	-
२१-२०२२	५००.००	५००.००	-	-	-	-	-	-	-
२२-२०२३	५००.००	-	-	-	-	-	-	-	-
कूण प्राप्त भागभांडवल :-			**८३५९.१६**		-	-	**४५२.९७**		**८८१२.१३**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास केंद्र शासनाकडून प्राप्त सन २०१९-२० करीता प्राप्त झालेल्या भागभांडवल रक्कम रु.१००.९७ लक्षचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.क्र.	प्राप्त दिनांक	शासन निर्णय क्रमांक	केंद्र शासन रु.लक्ष
१	१७/०२/२०२०	No.२००२५/०६/२०१८-Livelihood Government of India Ministry of Tribal Affairs दिनांक-१७/०२/२०२०	१००.९७
एकूण			**१००.९७**

वरील प्रमाणे केंद्र शासनाकडून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास रु.१००.९७ लक्ष इतकी भाग भांडवल रक्कम प्राप्त झालेली आहे. सदर प्राप्त झालेल्या भाग भांडवलाचे केंद्र शासनास भाग भांडवल प्रमाणपत्र (Share Certificate) पाठविणेस मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

आयत्या वेळेचा ठराव क्र.१ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या भाग भांडवल रक्कम रु.१००.९७ लक्षचे भाग भांडवल प्रमाणपत्र केंद्रशासनास देण्यासंबंधी मा.व्यवस्थापकीय संचालक यांना पुढील योग्य ते सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक

अनुमोदक :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

आयत्या वेळेचा विषय क्र.२:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे नियमित सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांना सातवा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे बाबत.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे.

महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

शबरी महामंडळामार्फत अ) अनुसुचित जमातीच्या व्यक्तीच्या आर्थिक विकासासाठी व कल्याणासाठी स्वत:च्या जबाबदारीवर किंवा सरकार, संवैधानिक संस्था, कंपन्या, भागिदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरणे यांच्या मार्फत कृषी उद्योग, लघु उद्योग, वाहतुक, वैद्यकीय, अभियांत्रिकी सारखा इतर धंदा/व्यवसाय, व्यापार किंवा कार्यालय यांच्या माध्यामातुन योजना आखणे, प्रचलित करणे. मदत करणे, सल्ला देणे, सहाय्य करणे, वित्तीय सहाय्य देणे, संरक्षण देणे आणि विविध उपक्रम हाती घेणे.

ब) आर्थिक स्थिती / पध्दती आणि उत्पादन निर्मिती, व्यवस्थापन आणि विपणन यांच्या तंत्राचा विकास करण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यात अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस समर्थ बनविण्यासाठी कामधंदा, व्यवसाय, व्यापार किंवा कार्य चालु करण्यासाठी भांडवल कर्ज मिळविण्याची साधने समुग्री आणि तांत्रिक व्यवस्थापकीय सहाय्य देण्याची तरतूद करणे.

क) वरील व्यतिरिक्त आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी योग्य ते आवश्यक वाटणारे इतर कार्य करणे.

याप्रमाणे कामकाज करण्यांत येत असुन सद्यस्थितीत कार्यालयामार्फत एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना, FPO/FPC योजना, आदिम जमाती विकास (PVTG) योजना, २७५(१) अंतर्गत विशेष केंद्रिय सहाय्य योजना, National Institute of Naturopathy (NIN) Pune योजना, वाहन प्रशिक्षण योजना, आदिवासी युवक युवतींना पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण यासारख्या विविध योजना राबविण्यांत येत आहे.

राज्य शासनाकडील वित्त विभाग शासन निर्णय क्र.शासाअ २०१९/प्र.क्र.९३/सा.अ.दिनांक ०४/०८/२०२१ नुसार सार्वजनिक उपक्रम / महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्या संदर्भात निकष निश्चित केलले आहे.

वरिल बाबी विचारात घेता, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे नियमित अधिकारी व कर्मचारी यांना दि.०१/०१/२०१६ पासुन सुधारीत वेतनश्रेणी लागू करणेसाठी राज्य शासनास प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

केलेला ठराव क्र.२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे नियमित सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांना सातवा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे साठी राज्य शासनास प्रस्ताव सादर करणेस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सर्व उपस्थित संचालकांचे आभार मानुन मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले आहे.

व्यवस्थापक (प्रकल्प)

मा.महाव्यवस्थापक (प्रशासन)

मा.महाव्यवस्थापक (वित्त)

मा.व्यवस्थापकीय संचालक

मा.अध्यक्ष साहे,
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक.